श्री.विजय अरुण खोरे, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव यांच्याकरिता प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांक:व्यशिअ-२०१८/(प्र.क्र.१०९)/व्यशि-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मुख्य इमारत, २ रा मजला, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: १६ सप्टेंबर, २०१९.

वाचा:-१) श्री.विजय अरुण खोरे यांचे दि.१४.०६.२०१८ रोजीचे पत्र.

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.०३/आस्था-१/विअखो/२०१८/प्र.क्र.१२४, दि.०१/०९/२०१८ रोजीचे पत्र.

३) विकलांग व्यक्तीसाठी अधिनियम (हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग, समान संधी), १९९५ चे कलम ४७.

४) शासकीय रुग्णालय, धुळे पी.डब्ल्यु.डी.बोर्ड, धुळे यांचे दि.२२/०५/२०१८ रोजीचे प्रमाणपत्र.

५) वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.०८/०७/२०१९ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना:-

श्री.विजय अरुण खोरे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तांत्रिक) संवर्गात नामनिर्देशनाने दि.०९/०१/२००१ रोजी प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गंगापूर, जि.औरंगाबाद या पदावर रुजू झाले होते. श्री.विजय अरुण खोरे हे सध्या प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव या पदावर कार्यरत असून, ते सदर रु.९३००-३४८००/- ग्रेड वेतन रु.४८००/- या वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत. सदर पदावर कार्यरत असतांना श्री.खोरे दि.२१.०४.२०१२ पासून ते आजतागायात हद्दय विकाराच्या आजाराने बेशुध्द अवस्थेत (कोमात) आहेत. अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय, धुळे यांनी संदर्भाधीन क्र.४ येथील प्रमाणपत्रान्वये श्री.खोरे हे ९०% विकलांग असून, त्यांना Quadriparesis chronic Ischaemic neurological disorder हा आजार असून, सदर आजाराबाबत THE ABOVE CONDITION IS PERMANENT NON-PROGRESSIVE, NON-LIKELY TO IMPROVE असे नमूद केले आहे. सदर आजारामुळे श्री.खोरे यांना दि.२१/०४/२०१२ पासून ते आजपर्यंत हृदयविकाराच्या आजाराने बेशुध्दावस्थेत (कोमात) आहेत. त्यामुळे श्री. खोरे यांना कार्यालयात येणे शक्य नाही. यास्तव, विकलांग व्यक्तीसाठी अधिनियम (हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग, समान संधी), १९९५ चे कलम

४७ मधील तरतुदीनुसार कर्मचा-याला कोणत्याही पदावर सामावून घेणे शक्य नसेल तर योग्य पद उपलब्ध होईपर्यंत किंवा त्याच्या सेवानिवृतिपर्यंत यापैकी अगोदर घडेल तोपर्यंत त्याला अधिसंख्य पदावर ठेवता यईल. सदर तरतूद विचारात घेवून श्री.विजय अरुण खोरे, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव यांच्याकरिता सेवासंरक्षणासहीत सर्व लाभ देण्याकरिता प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव या संवर्गामध्ये १ अधिसंख्य पद दि.२१.०४.२०१२ पासून श्री.खोरे यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृतिच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे.

शासन निर्णयः-

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेले श्री.विजय अरुण खोरे, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव यांचे वेतनश्रेणी रु.९३००-३४८००/- ग्रेड पे.रु.४८००/- (सहावा वेतन आयोग) या वेतनश्रेणीतील वेतन काढण्यासाठी महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तांत्रिक) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था या संवर्गातील १ अधिसंख्य पद दि.२१.०४.२०१२ पासून निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पद व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे.

३. सदर पद विकलांग व्यक्तीसाठी अधिनियम (हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग, समान संधी), १९९५ चे कलम ४७ मधील तरतुदीनुसार श्री.विजय अरुण खोरे, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव यांना सेवा संरक्षणासहित सर्व लाभ देण्याकरिता, दि.२१.०४.२०१२ पासून श्री.खोरे यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृतिच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद आपोआप संपुष्टात येईल.

४. सदर पदाच्या वेतन व भत्यावरील खर्च हा श्री.विजय अरुण खोरे, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली काढण्यात येतात त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

५. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौचारिक संदर्भ क्र.४२९/आपुक, दि.०३.०९.२०१९ अनुसार व उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.०८.०७.२०१९ रोजी संपन्न झालेल्या सन २०१९ च्या ४ थ्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९१६१२५३४८७५०३ हा आहे. हा हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manish
Sheshrao Milke

Digitally signed by Manish Sheshrao Milke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=116b8d4fe32ec9c9f7698810f585f3247df16981777aa4a590ca4347b30d6d0c,
serialNumber=6f926bfe623fd70a0a8117c29a1b771021c054c4d0b731a9033f01ad65b4c2eb, cn=Manish Sheshrao Milke
Date: 2019.09.16 13:06:58 +05'30'

(डॉ.मनिष शे. मिलके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति ,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मुंबई.
७. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
८. सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नाशिक (संचालकांमार्फत)
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१०. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव, जि. जळगाव (संचालकांमार्फत)
१२. उप कोषागार अधिकारी, अमळनेर, जि.जळगाव (संचालकांमार्फत)
१३. वित्त विभाग (आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई.
१४. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग (अ.क.-२), मंत्रालय, मुंबई.
१५. श्री.विजय अरुण खोरे, तत्का. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर,
१६. जि.जळगाव. (संचालकामार्फत)
१७. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमळनेर, जि.जळगाव (संचालकामार्फत)
१८. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जळगाव, जि.जळगाव (संचालकांमार्फत)
१९. निवडनस्ती (व्यशि-१)